# सहयोगी संवाद

## सहयोगी शिक्षण अभियान

अंक १: जानेवारी २०२१




## दोन शब्द

शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने मुहूर्तमेढ रोवलेल्या समाज शिक्षण केंद्राचे कार्य जोमात चालू आहे. कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर शिक्षणाचे खंडित झालेले कार्य पूर्ववत सुरू करणे निश्चितच सोपे नव्हते.

केवळ एका संदेशावर हे अवघड शिवधनुष्य पेलण्यासाठी सज्ज झालेले तालुका समन्वयक, शिक्षण सारथी, सरपंच, ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी यांचे विचार, भावना, अनुभव हे सर्व ''सहयोगी संवाद''या माध्यमातून आपल्या समोर मांडताना मनस्वी आनंद होत आहे.

संबंधितांच्या अनुभवाबरोबरच शिक्षण क्षेत्रात अविरत कार्यरत असणाऱ्या शिक्षणतज्ज्ञांचे विचार 'सहयोगी संवाद'या मंचावरून आपल्यापर्यंत पोहचवित आहोत. ते आपणास निश्चितच प्रेरणादायी ठरतील अशी खात्री वाटते. आपणही यात कृतीशील सहभाग घेऊन शिक्षणाचा रथ मार्गस्थ करण्यास हातभार लावावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## यशोगाथा SUCCESS





**गौखेल ग्रामपंचायतीचा समाजासमोर नवा आदर्श, शिक्षणासाठी आर्थिक मदतीचा ठराव**

**Gaukhel Dist: Beed - Shantilal Muttha Foundation** कोरोनामुळे आठ–नऊ महिन्यांपासून शाळा बंद असल्याने मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न bit.ly

SMF Website : https://bit.ly/3opR3QI
Instagram : https://bit.ly/2XIVsYV
LinkedIn : http://bit.ly/38rApKE
Facebook : http://bit.ly/3ordVPI
Twitter : https://bit.ly/3hS3ZMy
SMF Blog : http://bit.ly/2XjMYI9

# सद्यस्थिती

जिल्हे
१७

तालुके
३६

समाज
विद्या केंद्रे
१४०

शिक्षण
सारथी
१७३

विद्यार्थी
२४०७

तालुका समन्वयक

# अनुभव

## रंजना ताईनी गडचिरोलीत सुरु केली ११ समाज विद्या केंद्र



**रंजना लेंझे,**
तालुका समन्वयक
ता.जि.गडचिरोली

शाळा बंद असल्या तरी मुलांचे शिक्षण बंद होऊ नये म्हणून मी तालुका सिंदेवाई जिल्हा चंद्रपूर येथील माझ्या नवरगाव या गावात प्रथम समाज विद्या केंद्र स्वतःच्या राहत्या घरात सुरू करण्याचे ठरविले.

मी स्वतः समाज विद्या केंद्राची संकल्पना आधी पूर्णपणे समजून घेतली. त्यानुसार गावातील सरपंचांना भेटले. परंतु या गावांमध्ये कोविड पॉझिटिव्हची संख्या जास्त होती. सरपंचांनी मला सांगितले की उपक्रम खूप छान आहे, पण आपल्या गावांमध्ये सध्या सुरूवात करता येणार नाही. जर मुलांना काही झाले तर याची काळजी कोण घेणार?

त्यानंतर मी, गडचिरोली येथील आदिवासी भागात कुरखेडा तालुक्यातील देऊळगाव या गावी जाऊन सरपंच, ग्रामस्थ, पालकांच्या भेटी घेऊन, त्याबाबत चर्चा केली. त्यांनी मला खूप सहकार्य केले.

आता अशी एकूण अकरा केंद्रे गावकऱ्यांच्या सहकार्याने मी कुरखेडा तालुक्यात सुरू केली आहेत. तेथे २६६ विद्यार्थी शिकतात.

# समाजविद्या केंद्रे आनंदाची खाण



**रक्षिता डाकवे,**
तालुका समन्वयक
ता.चिपळूण, जि.रत्नागिरी

सुट्टी म्हटले की मुले खेळायला व मज्जा करायला मोकळी असतात. पण कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईटच असतो. २३ मार्च रोजी लॉकडाऊन जाहीर झाल्यावर मैदाने, बागा, शाळा ओस पडल्या. मुले चार भिंतीत कोंडली गेली.

चिपळूण तालुक्यात कोरोना बाधितांची संख्या बऱ्यापैकी होती. समाज विद्या केंद्र सुरू करण्यासाठी मी ग्रामसेवक श्री.संदीप सर यांची भेट घेतली.

विद्यार्थी, ग्रामस्थ, सरपंच, व पालकांनी मला पाठिंबा दिला. गावातील चार वाड्यांमध्ये एकाच दिवशी चार समाज विद्या केंद्रे सुरू झाली.

गावातल्या गावात असूनही विद्यार्थी शाळेत आल्यासारखे नीटनेटके येऊ लागले. सॅनिटायझर वापरणे , मास्क लावणे, सोशल डिस्टंसिंग पाळणे या सर्व बाबी नियमांनुसार होऊ लागल्या.

केंद्रावर प्रार्थना, गाणी, खेळ अशा विविध कृती होत असल्यामुळे मुले आनंदित राहू लागली. आता याच मुलांना खूप दिवसांनी आपल्या मित्र–मैत्रिणींसोबत शिकताना, खेळताना पाहून आमचा आनंद गगनात मावेनासा होतो.

धामणवणे गावात एकूण ५३, तर मालदोली गावात ५५ ते ६० विद्यार्थी समाज विद्या केंद्रांमध्ये आनंदाने शिकत आहेत.

## मी अनुभवलेले समाज विद्या केंद्र



**ऋतुजा पाटील,**
शिक्षण सारथी
ता.चिपळूण, जि.रत्नागिरी

आमच्या धामणवणे पिठलेवाडी ग्रामपंचायतीमार्फत समाज विद्या केंद्रातील सर्व विद्यार्थ्यांना मास्क आणि सॅनिटायझर देण्यात आले. सर्व विद्यार्थी कोरोनाचे नियम पाळून हसतखेळत अभ्यास करत आहेत. समाज विद्या केंद्राची सुरूवात श्लोक, प्रार्थना, समूहगीताने होते. या व्यतिरिक्त पाढे म्हणून घेणे, पाठांतर करून घेणे, गणितीय क्रिया करून घेणे, इंग्रजी महिने इंग्रजी स्पेलिंग करून घेणे, फळे, फुले, प्राणी, पक्षी यांची नावे इंग्रजीमध्ये लिहिणे अशा विविध गोष्टी/कृती विद्‌यार्थ्यांकडून करून घेतल्या जातात याबरोबरच विद्यार्थी खूप उत्साहाने अभ्यास करतात. विद्यार्थ्यांमध्ये वाचन, संभाषण कौशल्य, वैचारिक क्षमता, आत्मविश्वास वाढलेला दिसून येत आहे.

गुरूची भूमिका एखाद्या कुंभारासारखी असते. चिखलाच्या गोळ्याला आकार द्यायचा आणि त्यातून सुंदर शिल्प निर्माण करायचे. हे कुंभाराप्रमाणे मुलांना घडविणे त्यांच्या आयुष्याला आधार देणे हे कार्य कठीणच म्हटले पाहिजे. शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने कठीण काळात विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविला आहे. माझा या कामाला हातभार लागत आहे याचा मला आनंद आहे.

## शुद्ध बीजा पोटी, फळे रसाळ गोमटी



**श्रावणी शैलेश सुतार**
धामणवणे, चिपळूण,
जि.रत्नागिरी

शुद्ध बीज पेरले तर लागणारी फळेही रसाळ, गोडवा देणारी असतात. ज्यांना खरंच नवीन काहीतरी शिकण्याची आवड आहे, अशांसाठी समाज विद्या केंद्र चालविताना विशेष आनंद होत आहे.

वय वर्ष ६ ते १३ वयोगटातील मुलांना एकत्र शिकविताना जे अनुभव मिळत आहेत, ते अवर्णनीय आहेत.

प्रत्येकाची आवड काय आहे हे कळले की शिकविताना कृतींची निवड करता येते.

सहयोगी शिक्षणाच्या विमानात बसून सर्वांना आकाशात गरुडझेप घ्यायची आहे. शिक्षण सारथी म्हणून जे जे आवश्यक आहे ते ते मी मुलांना देण्याचा प्रयत्न करीत आहे. मुले एकदा रमली की दिलेला अभ्यास उत्तमरित्या पूर्ण करतात असा माझा अनुभव आहे.

## सरपंच यांचे अनुभव

कोरोनाच्या काळात गावातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तर होतच होते, पण त्यासोबत त्यांचे मानसिक आरोग्य खालावत चालले होते. आम्ही सुरू केलेल्या समाज विद्या केंद्रामुळे मुलांमध्ये एक नवीन उत्साह निर्माण झाला. त्यांना आनंद मिळू लागला. शिक्षण सारथी खूप चांगल्या पद्धतीने मुलांसोबत वेगवेगळ्या कृती करून घेतात. मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत आहे. विद्यार्थ्यांच्या मनावरील दडपण कमी झाले आहे. या समाज विद्या केंद्रास पालक भेट देऊन समाधान व्यक्त करत आहेत.



**डॉ. श्रीराम गर्जे**
गाव–खिळद,
ता.आष्टी,जि.बीड

# शिक्षणाची अशीही नवी वाट .......



**सचिन वाळुंजकर**
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन.
मुख्य कार्यालय पुणे

'ज्ञान ही शक्ती आहे. ते माहिती युक्त आहे. प्रत्येक कुटुंबामध्ये, प्रत्येक समाजात शिक्षण प्रगतीचा एक भाग आहे' – कोफी अन्नान.

वरील उक्तीप्रमाणे अनादी काळापासून भारतीय संस्कृतीत शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. विविध मार्गांनी शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविले जात आहे आणि येथून पुढेही पोहचविले जाईल. मुलांच्या सर्वांगीण विकासाचा सर्व भार पेलणारी व्यक्ती म्हणजे शिक्षक. काही अपवाद वगळता पालकांचा सहभाग असेलही परंतु तो फारच कमी.

कोरोना विषाणूने असा धुमाकूळ घातला की काही समजलेच नाही. एकीकडे शाळा बंद, बाहेर जाण्यास बंदी, मित्रांना भेटता येत नव्हते. मुलांच्या शिक्षणाचे काय हा एकच प्रश्न पालकांना भेडसावित होता. ऑनलाईन शिक्षणाचा फारसा अनुभव नसलेले हे सर्व लोक वादळात भरकटलेल्या नौकेसारखे सैरभैर झाले होते. याचे दूरगामी परिणाम तर ग्रामिण भागात खूपच मोठ्या प्रमाणात दिसून आले. शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने गावागावात समाज विद्या केंद्रे स्थापन करून गावातीलच होतकरू स्वंयसेवकाच्या मदतीने मुलांपर्यंत शिक्षण पोहचवायचे अशी नाविन्यपूर्ण कल्पना राबविली.

शाळा, झाड, चावडी, मंदिर अशा उपलब्ध जागेत सुरू असलेली समाज विद्या केंद्रे कोरोनाच्या काळात, मुलांच्या शिक्षणासाठी खूपच फायदेशीर ठरत आहेत. सर्व स्वंयसेवक देवदूतासारखे आपल्या गावातील मुलांच्या शिक्षणासाठी द्रोणाचार्यांची भूमिका बजावित आहेत.

# फिटे अंधाराचे जाळे...



**विद्याधर शुक्ल,**
उपसंचालक, (निवृत्त)
एस.सी.ई.आर.टी. पुणे

मागच्या वर्षी जानेवारी महिन्यापासून कोरोनाच्या बातम्या सुरू झाल्या आणि मार्चअखेर बघता बघता करोनाची लाट जगातील सर्व देशांपर्यंत पोहोचली. अत्यावश्यक सेवा सोडता सर्वजण आपापल्या घरात कोंडून राहिले. 'भय इथले संपत नाही' अशी स्थिती निर्माण झाली. अवसान गोळा करून नेहमीचे व्यवहार सुरु करायला जावे तर 'धरले तर चावते, सोडले तर पळते' अशी स्थिती.

मुलांच्यावर या सगळ्या परिस्थितीचा परिणाम होणे स्वाभाविकच होते. शाळेत मित्र–मैत्रिणींशी गप्पागोष्टी, कट्टी–बट्टी, एकत्र डबा खायची गंमत, रोजचे शिवणापाणी, टिपऱ्या, लंगडीसारखे खेळ अशा सगळ्या आनंदाला लहान मुले अगदी पारखी झाली. ही मानसिक कोंडी कुठेतरी, कोणीतरी फोडण्याची नितांत आवश्यकता होती.

कोणत्याही सामाजिक संकटाला चांगले काम करण्याची संधी मानत आलेल्या शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने ही परिस्थिती समाजसेवेची संधी म्हणून स्विकारायचा निश्चय केला. लहान मुलांनी सुरक्षिततेचे नियम पाळून थोडावेळ एकत्र यावे, खेळावे, शिक्षणात खंड पडू नये आणि मुले मानसिकदृष्ट्या दडपण मुक्त रहावित यासाठी 'सहयोगी शिक्षण अभियान' सुरू झाले. यामुळे कुटुंबांना आणि मुलांना थोडातरी दिलासा मिळाला. मुलांची अगदी थांबलेली किलबिल पुन्हा सुरू झाली. गंभीर आणि भयभीत वातावरण किंचित का होईन हसरे आणि खेळकर झाले. या बदलांमध्ये सरपंच, गावकरी आणि मुख्यतः सारथी मित्र यांचा सिंहाचा वाटा आहे.

समस्या सोडविण्यासाठी शासन मदत करतच असते, पण त्यासाठी गावाने पुढाकार घेतला तर कितीही मोठ्या कामाचा गोवर्धन पर्वत उचलता येतो, याचाच अनुभव पुन्हा एकदा येत आहे. या सर्व प्रयत्नांत शांतिलाल मुथ्था फाउंडेशन आपला खारीचा वाटा उचलत राहणार आहे. अनेक गावात सुरू झालेली केंद्रे पाहून शेजारची गावे पण उत्साहाने पुढे येत आहेत. सहयोगी शिक्षण अभियान वाड्या, वस्त्यांपर्यंत पोहोचून शिक्षणाचे आटलेले झरे पुन्हा जिवंत होतील आणि कोरोनामुळे निर्माण झालेली परिस्थिती सुरळीत करण्यासाठी हातभार लागेल यांत शंकाच नाही.

# माझा कट्टा















